**मे. शालिमार पेन्टस लिमिटेड, गोंदे दुमाला, इगतपुरी, जिल्हा नाशिक, महाराष्ट्र येथील प्रस्तावित रंग उत्पादन विस्तार प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्तांत :**

.................................................................................................................................

मे. शालिमार पेन्टस लिमिटेड, गट नं. १२१, १२६, १२७, १३२, १३३-ब, १३४-ब, १४१ गोंदे दुमाला, ता. इगतपुरी, जि. नाशिक, महाराष्ट्र या उदयोगाच्या खालीलप्रमाणे विस्तार प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. उप-विभागीय अधिकारी, इगतपुरी यांचे अध्यक्षतेखाली दि. १६ नोव्हेंबर २०२२ रोजी दुपारी १२-३० वाजता घेण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १. पाण्यावर आधारित रंग | : | ४१७ कि.लि. प्रति महिना ते १८०० मे.टन प्रति महिना |
| २. विद्रावक आधारित रंग | : | ५०० कि.लि. प्रति महिना ते २२०० कि.लि. प्रति महिना |
| ३. राळ | : | ३०० कि.लि. प्रति महिना ते ६०० कि.लि. प्रति महिना |

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या मान्यतेने कार्यालयीन आदेश क्रं. ई - ९१ / २०२२ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २२१११५ – एफटीएस– ०१६६ दि. १५/११/२०२२ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. उप-विभागीय अधिकारी, इगतपुरी | : | अध्यक्ष |
| २. | प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, नाशिक | : | सदस्य |
| ३. | उप-प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, नाशिक | : | सयोजक |

श्री. अमर दुर्गुळे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नाशिक तथा संयोजक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. संयोजक यांनी सदर पर्यावरण विषयक सुनावणी बाबतचे महत्व तसेच याबाबत केलेल्या कार्यप्रणालीची माहिती दिली.

उप-प्रादेशिक अधिकारी तथा संयोजक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर प्रकल्पा बाबत अदयाप पावेतो उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ नाशिककडे कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात प्राप्त झालेले नाहीत व या ठिकाणी कांही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी सदर सुनावणी सुरु करणेस परवानगी दिली.

श्री. बिराजदार, प्रकल्पाचे प्रतिनिधी यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले. जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

सदर सुनावणी दरम्यान खालीलप्रमाणे मुददे उपस्थित करण्यात आले.

| अ. क्रं. | टिका टिप्पणी, आक्षेप सुचना मुददा इत्यादी | उदयोगाच्या प्रतिनिधीने दिलेले उत्तर |
|---|---|---|
| १. | श्री. शरद सोनवणे, सरपंच गांदे दुमाला ता. इगतपुरी, जि. नाशिक - सदर उदयोगाने जल व हवा प्रदूषण नियंत्रणासाठी कोणत्या उपाय योजना केल्या आहेत? | उदयोगाने औदयोगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी १५ घ. मि. क्षमतेचा औदयोगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारलेली आहे. तसेच झेडएलडी टेक्नॉलॉजीचा अवलंब करण्यात येईल. घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारलेली आहे व प्रक्रियाकृत सांडपाण्याचा वापर उदयोगाच्या आवारातील बाग बगीच्यासाठी करण्यात येतो.<br><br>हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी चिमणी व स्क्रबर बसविण्यात आले आहेत. तसेच पावडर हाताळणी विभागातसुध्दा आवश्यक ती उपाय योजना करण्यात आली आहे. |
| २. | उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नाशिक तथा संयोजक -<br><br>सादरीकरणात नमुद करण्यात आलेला रुपये २७ करोड प्रकल्पाचा अंदाजित खर्च प्रस्तावित विस्तारीकरणासाठी आहे किंवा कसे? | रुपये २७ करोड प्रकल्पाचा अंदाजित खर्च प्रस्तावित विस्तारीकरणासाठी आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नाशिक तथा संयोजक -<br><br>हवेची आढळून आलेली गुणवत्ता व मानके याबाबतची माहिती सादरीकरणात नमूद करण्यात आली नाही. | सदर बाबत पुर्तता अहवाल करण्यात येईल. |
| ४ | उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नाशिक तथा संयोजक -<br><br>भुजल पाण्याच्या गुणवत्ते बाबत मुददा उपस्थित केला. | गोंडे, मुरबी, वाडीव-हे, सांजेगांव, मुकणे, बेळगांव, नांदूर वैदय, जानोरी इत्यादी ०८ ठिकाणी भुजलाचे नमुदे गोळा करण्यात आले आणि आयएस १०५०० (२०१२) मानकांमध्ये नमूद केलेल्या २९ मापदंडांचे विश्लेषण करण्यात आले. टीडीए मुल्यांकनाची कक्षा १३२ – ४१५ मी.ग्र. / ली. पर्यंत आहे व सर्व नमुन्यांमध्ये स्वीकार्य मर्यादेपेक्षा कमी आहे. पाण्याचा एकूण कठीणपणा जी डब्ल्यू २, जी डब्ल्यू ५, जी डब्ल्यू ६, जी डब्ल्यू ७ आणि जी डब्ल्यू ८ मध्ये स्वीकार्य मर्यादेपेक्षा जास्त आहे. जी डब्ल्यू ३ वगळता सर्व नमुन्यांमध्ये एकूण नायट्रोजनचे प्रमाण स्वीकार्य मर्यादेपेक्षा जास्त आढळते. |
| ५ | उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नाशिक तथा संयोजक - | उत्पादन प्रकियेमध्ये पाण्याचा वापर वाढणार आहे. उत्पादन प्रक्रियेमध्ये जेटचा वापर करण्यात येणार असल्यामुळे औदयोगिक सांडपाणी किमान तयार होणार असून त्याचा पुर्नवापर प्रकियेमध्ये करण्यात येणार असल्यामुळे |

| | | |
|---|---|---|
| | उत्पादन क्षमतेत तीनपट वाढ होणार असल्यामुळे औदयोगिक सांडपाणी निर्मीतीत वाढ होईल किंवा कसे? | औदयोगिक सांडपाणी निर्मीतीत वाढ होणार नाही. |
| ६ | उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नाशिक तथा संयोजक -<br>उदयोगाची पाण्याची गरज कशी भागविण्यात येत आहे व विस्तारीकरणानंतर पाण्याची गरज कशी भागविण्यात येईल? | कारखाना परिसरात बोअरवेलने सध्याची पाण्याची गरज भागविण्यात येते. उदयोगाने सीजीडब्ल्यूएची परवानगी घेतली आहे. तसेच गरजेनुसार पाणीपुरवठयासाठी ठेकेदार निश्चित केला आहे व ठेकेदार त्याच्या मालकीच्या बोअरवेलमधून मागणीनुसार पाणीपुरवठा करणार आहे. |
| ७. | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नाशिक तथा सदस्य जाहीर लोक सुनावणी -<br>सदय:स्थितीत कॉन्ट्रॅक्टरकडून त्याच्या बोअरवेलच्या पाण्याचा पुरवठा उदयोगास करण्यात येत आहे किंवा कसे? तसेच सदर कान्ट्रॅक्टरने यासंबंधात सीजीडब्ल्यूएची परवानगी घेतली आहे किंवा कसे? | सदर बाबत योग्य ती पडताळणी करण्यात येईल. |
| ८ | मा. अध्यक्ष तथा उप-विभागीय अधिकारी, इगतपुरी | सरपंच, गोंदे दुमाला यांनी नमूद केले की, सदर उदयोगास आवश्यकतेनुसार पाणी पुरवठा गांवात उपलब्ध असलेल्या पाणी पुरवठा योजनेतून व प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेतून करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| | गोंदे दुमाला गावाची पाण्याची गरज भागवुन सदर उदयोगास पाणी कसे उपलब्ध करुन देण्यात येईल? | | |

सदर जाहीर लोक सुनावणीचे संयोजक यांनी नमूद केले की, अजुनही कोणाला कांही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात परंतु कोणीही मुददा उपस्थित केला नाही. त्यांनी पुढे नमुद केले की, सदर जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्यात येईल.

उपस्थितांचे आभार मानून सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **( अमर दुर्गुळे )** | **( रविंद्र आंधळे )** | **(तेजस चव्हाण)** |
| संयोजक तथा उप्राअ<br>मप्रनि मं. नाशिक | सदस्य तथा प्रा.अ.<br>मप्रनि मं. नाशिक | अध्यक्ष तथा<br>उप-विभागीय अधिकारी,इगतपुरी |